**परिपत्रक क्रमांक 309 दिनांक 29/04/2004.**

विषय :- सार्वजनिक न्यासांच्या निरिक्षणाबाबत.
पहा :- परिपत्रक क्रमांक 282 दिनांक 15/02/1993.

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी या कार्यालयातील अधिकारी वर्ग व सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई या कार्यालयातील निरिक्षक यांच्या दिनांक 17/3/2004 रोजी झालेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे सुधारित परिपत्रक काढण्यात येत आहे.

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन परिपत्रक क्रमांक 109 व परिपत्रक क्रमांक 160 तसेच परिपत्रक क्रमांक 262 मध्ये अंशत: फेरफार करुन असे आदेश देण्यात येत आहेत की, सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा 1950 खालील सार्वजनिक न्यासाच्या निरिक्षणाबाबत सर्व विभागीय व उपविभागीय कार्यालयातील निरिक्षकांनी रुपये 10,00,000/- ( रुपये दहा लाख मात्र) पर्यंत उत्पन्न असलेल्या न्यासांचे निरिक्षण करावे.

तसेच रु.10,00,000/- पेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या न्यासाचे निरिक्षण निरिक्षकांमार्फत करणे आवश्यक वाटल्यास तशा खास सूचना संबंधित विभागिय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारात निरिक्षकांना लेखी घ्याव्यात. ज्या न्यासाचे उत्पन्न रु.10,00,000/- पेक्षा जास्त असेल अशा न्यासांचे निरिक्षण सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी करावे.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मुंबई
दिनांक - 17/3/2004.

प्रत :-

1. परिपत्रक नस्ती.
2. सर्व कार्यालये.